# पानापानातली कथा

(निसर्गपर काव्यसंग्रह - भाग ८)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**पानापानातली कथा** (निसर्गपर काव्यसंग्रह – भाग ८)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई – ४०० ०३०.
भ्रमणध्वनी – ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता** : २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट–२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे – ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १–एन, सेक्टर ए, एन–१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर – ४३१००३.
भ्रमणध्वनी – ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995372-2-4

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ २००/–**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

'पानापानातली कथा' हा काव्यसंग्रह माझ्यासाठी फक्त शब्दांचा संग्रह नाही; तो माझं मन आहे. माझ्या भावना आहेत, माझे ऋतू आहेत, माझी एकांतातली शांतता आहे, माझ्या डोळ्यांत पसरलेलं आकाश आहे, आणि माझ्या अंतर्मनातील एका खोल जागेवर ठेवलेली प्रार्थना आहे. निसर्गाशी माझा संबंध नेहमीच शब्दांच्या पलीकडचा होता. मी त्याला पाहत नव्हते, मी त्याला जगत होते. वाऱ्याची झुळूक कानाशी आली की मला वाटायचं कुणीतरी बोलतंय. पानं सळसळली की वाटायचं त्यांच्या गोष्टी सुरू झाल्या. रानफुल उमटलं की मनात काहीतरी उगवतंय. शेतावरची पहाट दिसली की मला कविता सापडायची आणि संध्याकाळ उतरताना जेव्हा प्रकाश हळूहळू फाटक्या वस्त्रासारखा गडद होत जायचा, तेव्हा मला जाणवायचं जीवनाच्या कथा किती शांतपणे संपून पुन्हा सुरू होतात. कविता लिहिणं माझ्यासाठी काही ठरवून केलेलं काम नव्हतं. कविता माझ्याकडे चालून येत असे. जणू एखादा पक्षी खिडकीवर बसावा, तसा एखादा क्षण मनावर येऊन विसावे आणि मग शब्द उमलावेत. निसर्गात एक विलक्षण जिव्हाळा असतो. तो माणसाच्या वेदना ऐकतो, आनंद साठवतो, शांतता देतो. माझ्या मनातही असेच अनेक क्षण होते. कधी अस्वस्थ, कधी ओले, कधी शांत, कधी जिवंत. निसर्गाने त्या सर्वांना हात दिला आणि त्या सगळ्या क्षणांनी मिळून हा संग्रह जन्माला आला. मी कविता लिहिताना निसर्गाला 'बाहेर' ठेवत नाही. मी त्याला माझ्या 'आत' येऊ देते. पानांची सळसळ माझे शब्द बनते. पाऊस माझ्या ओळींमध्ये भिजतो. चांदणं माझ्या कवितेच्या कडव्यात थांबतं. फुलांचा सुगंध माझ्या रूपकांत येतो. आणि मनातल्या भावना ऋतूंसारख्या एकामागोमाग उमलत जातात.

'पानापानातली कथा' हे नाव मला तेव्हाच सापडलं जेव्हा मला जाणवलं आपल्या आयुष्यातील प्रत्येक दिवस म्हणजे एक पान. ते पान कधी हिरवं, कधी

पिवळं, कधी कोवळं, कधी सुकलेलं. तसं मनही. मनाला जे वाटतं, ते त्या दिवसाच्या पानावर उमटतं. आणि हे सर्व मिळून आपल्या जीवनाचं वृहद्? वृक्ष तयार होतं. मी या पुस्तकातील प्रत्येक कवितेला हात लावण्यापूर्वी ती 'मनात ऐकली'. निसर्ग माझ्याशी जे बोलला तेच मी तुम्हाला दिलं आहे. कविता लिहिली नाही त्या मला मिळाल्या. त्या पानापानातून प्रकट झाल्या. मी फक्त त्यांना शब्दरूप दिलं. या संग्रहातून मला एकच संदेश द्यायचा आहे. निसर्ग फक्त पाहायचा नसतो; त्याच्याशी मैत्री करायची असते. जेव्हा आपण निसर्गाशी बोलतो, तो आपल्या मनातील शांततेला हात देतो. आणि जेव्हा मन शांत होतं, तेव्हा कविता जन्मते. माझ्या या कविताही तशाच जन्मल्या निसर्गाच्या कुशीतून, आणि शांत मनातून.

'पानापानातली कथा' वाचताना तुम्हालाही तुमचं एखादं पान सापडलं एखादी आठवण, एखादी भावना, एखादं लहानसं सुख तर माझे शब्द सफल झाले असे मी मानेन. हा संग्रह मी तुम्हाला देत आहे मनातील ओल ठेवून, निसर्गाच्या सुगंधासकट, आणि हृदयातील शांततेच्या आशीर्वादासह.

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

निसर्गाला शब्द नसतात, पण त्याच्या प्रत्येक पानाला, प्रत्येक फुलाला, प्रत्येक श्वासाला एक कथा असते. त्या कथा आपण ऐकू शकत नाही असं नाही; आपण त्या 'ऐकण्याइतके शांत' राहत नाही, एवढंच खरं. माणसाच्या जीवनात निसर्ग हा सतत उपस्थित असतो. कधी दुरून पाहणाऱ्या, कधी वाऱ्याच्या रूपाने बोलणाऱ्या, कधी पावसाच्या रूपाने हळव्या स्पर्शाने आपल्या मनात उमलणाऱ्या.

'पानापानातली कथा' हा काव्यसंग्रह म्हणजे निसर्गाच्या त्या शतजिव्हाळ्या कथांशी छेडछाड करणारी, त्यांना शब्दांचा ओवाळा घालणारी एक कोमल लेखणी आहे. या संग्रहातील कवितांची दुनिया कोणत्याही नकाशावर सापडणारी नाही; ती आपल्या मनाच्या तळातल्या त्या नाजूक जागेत वसलेली आहे जिथे ओलसर मातीचा सुगंध, दवबिंदूचा प्रकाश, फुलांचा नाजूक पहाटस्पर्श, आणि संध्याकाळच्या उमलत्या शांततेचा मंद श्वास एकत्र गुंफलेले आहेत. कवयित्रीने निसर्गाला केवळ पाहिलं नाही, तर त्याच्याशी संवाद साधला आहे. जणू झाडांच्या पानांशी बोलताना तिच्या हृदयाने जे ऐकले, तेच शब्दांच्या रूपाने इथे उमटले आहे.

'पानापानातली कथा' या नावातच एक मोहक रहस्य आहे. पान म्हणजे जगण्याची लहानशी पातळी जी दरवेळेस वेगळी असते. पान म्हणजे बदल. पान म्हणजे ऋतूंचा प्रवास. पान म्हणजे निसर्गाची कथा लिहिणारा एक छोटा अनाम लेखक. त्या प्रत्येक पानावर देवाने अदृश्य अक्षरांनी लिहिलेल्या कथांची सुगंधित झुळूक कवयित्रीने नीट जपून शब्दांत बांधली आहे. या संग्रहातील प्रत्येक कविता एखाद्या पानासारखीच आहे. कोणी कोवळी, कोणी हलकी पिवळी, कोणी वाऱ्यावर नाचणारी, कोणी निरव शांत बसलेली. कोणी पावसाच्या पहिल्या

स्पर्शात भिजलेली, कोणी उन्हाच्या सौम्य प्रकाशात चमकलेली, तर कोणी रात्रीच्या काळोखात चंद्रप्रकाशानं विणलेली. कवयित्रीच्या शब्दांत स्वतःचा एक ठाम सुर आहे. तिच्या लेखणीत निसर्गाला 'पहाण्याची' नाही, तर 'जगण्याची' ताकद आहे. पाऊस येतो तेव्हा तो तिच्या कवितेत फक्त 'वरून पडणारे थेंब' नसतात; तो बालपणीच्या आठवणींचा झरा ठरतो. झाडांची सळसळ केवळ आवाज नसते; ती मनात धुसफुसणाऱ्या भावना असतात. सूर्यप्रकाश फक्त प्रकाश देत नाही; तो मनाच्या आडोशाला वर्षानुवर्षे दडलेली धूळ झटकतो आणि नवीन आरंभाला आमंत्रण देतो. संध्याकाळी उतरलेला केशरी रंग तिच्याकडे वेळ होत नाही म्हणून धावणाऱ्या माणसाला थांबून स्वतःकडे पाहण्याचा धीर देतो. या संग्रहातील कविता वाचताना अनेकदा जाणवतं की निसर्ग फक्त बाहेर नाही. तो आपल्या मनातही तितकाच पसरलेला आहे. आपण माळरानावरून चाललो की, गवताची शिशिरस्फुट स्पर्श-शीतलता आपल्याला जशी जाणवते, तशीच ही कविता मनात येणाऱ्या भावनांना स्पर्श करते. कविता म्हणजे मनाचा स्पर्श. निसर्ग म्हणजे मनाचा श्वास. म्हणूनच हा संग्रह 'निसर्गपर कविता' असूनही फक्त निसर्गाविषयी नाही; तो मनाविषयी आहे.

या कवितांमध्ये वारा आहे. जुन्या आठवणींची पानं उडवणारा. पाऊस आहे न बोललेल्या शब्दांना ओल देणारा. धुकं आहे भावनांचे धूसर रेखाटन करणारा. चांदणं आहे रात्रीची प्रार्थना ऐकणारा. नदी आहे गेल्या भावनांना वाहून नेणारी. डोंगर आहे विश्वासाची उंची शिकवणारा. कवयित्रीने या सगळ्याला इतक्या नाजूक स्पर्शानं कवितेत आणलं आहे की वाचक निसर्गाशी पुन्हा ओळख करून घेतो जणू एक विसरलेला जुना मित्र. या कविता वाचताना नकळत आपल्या मनातील सुकलेली पानं पुन्हा हिरवी होतात. जखमा थोड्या भरतात. सुस्कारे शांत होतात. हसू नकळत उमलतं. अशा कवितांना वेळ लागत नाही; त्या 'विरून' नाही जात. त्या आपल्या आत रहातात. या संग्रहातील सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे नि:शब्दता. शब्द लिहिलेले असतात, पण त्यांच्या मधल्या शांत जागा त्या मात्र निसर्गाची खरी भाषा बोलतात. त्या जागांतूनच आपल्याला निसर्गाचा स्पर्श मिळतो. आणि याच स्पर्शातून कविता साकारते.

'पानापानातली कथा' हा संग्रह म्हणजे साहित्याच्या परंपरेला जपणारी एक सुंदर पानेरी. ज्येष्ठ साहित्यिकांच्या लेखणीतून उमटणाऱ्या कोमल प्रतिमा,

सूचिन्तित भाव, आणि साधेपणात दडलेलं गाढ सौंदर्य यांची छटा या पुस्तकात सहज दिसते.

हा संग्रह फक्त वाचनासाठी नाही; तो अनुभवण्यासाठी आहे. तो जगण्यासाठी आहे. तो मनाला स्वच्छ पांढरं कागद करून देण्यासाठी आहे. अशा शब्दांसाठी प्रचंड अंतःप्रेरणा लागते. निसर्गावर प्रेम लागते. मनात निर्मळ जागा लागते. कवयित्रीच्या लेखणीत ही निर्मळता आहे; आणि म्हणूनच हा संग्रह वाचकाला स्वतःच्या निसर्गाशी पुन्हा एकदा भेट घडवून आणतो. हा काव्यसंग्रह येत आहे हिरव्यापानांवरील दवबिंदूसारखा, सकाळच्या धुक्यासारखा, शांत नदीसारखा, आणि मनात खोलवर जाणाऱ्या प्रत्येक सुगंधासारखा.

**श्री. विजय रणदिवे**
निवृत्त कार्यक्रम अधिकारी
आकाशवाणी, औरंगाबाद

# अनुक्रमणिका


१) मन हिरव्या क्षणांचे ... १३
२) तप्त झळा मातल्या ... १४
३) नवीन प्राण हे फुंकावे ... १५
४) वेळा चुकल्या ऋतूंच्या ... १६
५) नववधूची मोहिनी ... १७
६) पारदर्शी मन वसता ... १८
७) संगत असता मोहिनी ऋतूची ... १९
८) जीवन दुधावरली साय ... २०
९) गुलमोहराची आली थंडाळी उन्हात ... २१
१०) हे थेंबांचे मोती सुंदर ... २२
११) अनुरागासी नवे खुमार ... २३
१२) बरस बरस हे बरस नभा ... २४
१३) जीव पावसातून गोळा ... २५
१४) पाऊस म्हणजे काय ... २६
१५) आई म्हणजे तत्त्व चिरंतन ... २७
१६) पाऊस गुडूप व्हावा ... २८
१७) मधुर मधुरतम माधुर्याची ... २९
१८) थांब जरा तू राजा वरुणा ... ३०
१९) हरित दुलई जी अंथरलेली ... ३१
२०) भीज पावसाची ... ३२
२१) जावळाचे शेत ... ३३
२२) पाऊस हा दुराव्याची दोर कशी तोडी ... ३४
२३) वाट कुणाची पाहते धरणी ... ३५
२४) जरा वळून पहावे ... ३६
२५) पुनव मनात विराळी ... ३७
२६) चिंब ओल्या वाटेवरती ... ३८
२७) बरवा श्रावण जन्मला ... ३९
२८) भरलेल्या मेघांची तोरणे ... ४०
२९) ती शुभांगी पुष्पिका ... ४१
३०) वर्षाराणीचे चित्र मोहक ... ४२
३१) इथे विसावती कला ... ४३
३२) सांगते सृष्टी ही काय ... ४४
३३) बीज अंकुरे अंकुरे ... ४५
३४) नयनसूख कोणते कळावे ... ४६
३५) दिशा उजळता ज्योती पसरते ... ४७
३६) वसुंधरा यौवनात ... ४८
३७) घर वेगळे नकोच सजणा ... ४९
३८) प्रभातवेळी किरणशलाका ... ५०
३९) दाण्यादाण्यात शिरीहरी ... ५१
४०) वसंतातली वसंतगाणी ... ५२
४१) काही कवडसे ऐसे ... ५३
४२) ही पाण्याची कहाणी ... ५४
४३) सुरम्य जगणे दिसावे ... ५५



## (१)
## मन हिरव्या क्षणांचे

आस हिरव्या तळ्याशी
काठ हिरवे भरले
तृण ताजे हिरवाले
हिरवाई पांघरले

झाडं हिरवे हिरवे
वेली हिरव्या बरव्या
कलिकाही हिरव्याशा
हासू गोडाले झरव्या

लाटा हिरव्या हिरव्या
वाटा हिरवाईतल्या
पायी रेशीम हिरवी
माया मिरवाईतल्या

झाडी हिरवीगार ती
हिरवली गार हवा
पाचू ओसरले किती
रंग हिरवार नवा

नभ हिरवुसलेले
जळ हिरव हिरवे
भुई हिरवी तरवी
सुख हिरवे मिरवे

घरकुल हिरव्याशा
ऱ्या भऱ्या स्वप्नांचे
घरदार हिरवाळ
मन हिरव्या क्षणांचे
मन हिरव्या क्षणांचे....

दि.१२/०४/२०२४
सकाळी ०८.११ वा.



## (२)
### तप्त झळा मातल्या

तप्त झळा मातल्या
ओकतात आग ही
भुईमध्ये दबलेल्या
उष्म्याला जाग ही

सकाळीच तापतो
तळपतो मार्तंड
राग त्याचा अनावर
ताप वाटे प्रचंड

गरमीचा उच्चांक
अंगी लाही लाही
जीव असो कोणताही
ओरडतो त्राहि त्राहि

दोष निसर्गाचा ना
मानवाचा आहे हा
तोडुनिया जंगलांना
प्रगतीला पाहे हा

घालविली हिरवाई
संकटात धरती आई
आपल्याच विनाशाची
माणसा तुला का घाई

दि.२४/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.



## (३)
## नवीन प्राण हे फुंकावे

घेऊन जा रे तिथे मला तू
उमलून येईल मन
सृष्टी संगे हिरवाईच्या
बनात राहील मन

घर कौलारू साधे असू दे
तुझ्या नि माझ्या स्वप्नीचे
भवताली मग स्वर्ग अवतरे
नंदनवन जणू पृथ्वीचे

रोजरोजची फुले हासरी
रंगामध्ये माखून ती
मला खुणावती न्याहाळ न्याहाळती
हळूच पाहती वाकून ती

पायाखाली हिरवाईची
माया मल्मली अंथरली
तुझी नि माझी प्रीत आगळी
इथेच राजा मंतरली

वरून वाकले डोक्यावरती
सुंदर छत आकाशाचे
डॉगर सारे हिरव्या दुलयीत
रस्ते हळव्या प्रकाशाचे

रोज वाटते नवीन जगणे
नवीन प्राण हे फुंकावे
ओंजळ देते प्रीत फुलांची
हरखून त्यांना हुंगावे

दि. ०९/०५/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (४)
## वेळा चुकल्या ऋतूंच्या

धरा तापली तापली
भुई कासावीस झाली
त्यात वैशाख वणवा
रणरण ऊन्हं व्याली

आग ओकतो रोजच
वर सुर्व्या बसून
मग वाटते उगाच
पाहतो का तो हसून

करा नुकसान तुम्ही
आम्ही रौद्र रूप दावू
माय बाप निसर्गाचा
नका दुखावून देऊ

नाईलाज आमुचाही
राग कसा तो करावा
आपणच निर्मीयले
त्याचा काळ का ठरावा

वेळा चुकल्या ऋतूंच्या
घ्यावा शिडकावा थोडा
कुठे शीतल गारवा
कुठे अवकाळी खोडा

आता तरी सुधरावे
जरा नव्याने पहावे
भाव हळवे जरासे
आम्हासाठी ही ठेवावे

दि.१३/०५/२०२४
रात्री ११.५६ वा.



(५)

## नववधूची मोहिनी

सोन हळदीने माखलेली
ही बहाव्याची नवरी
पाहुनी भवताली दिसते
का अशी ती बावरी

रंग कोणी सांडला हा
स्वर्णकांती मोहना
लुभवितो स्वप्नांसवे
का बहावीच्या मना

अंग अंगांवरती पसरे
वर्ख सोन्याचा जसा
अन मुलामा कोणी दिधला
नव सुखाचा हा असा

हासते ती हासते का
मुरक्या मुरक्या लाजते
प्रीत साम्राज्यात नवखी
प्रेम कहाणी गाजते

रंग येतील नवनवे ते
रोज आता जीवनी
नवरोबाच्या मानसीला
नववधूची मोहिनी

दि.१६/०५/२०२४
सकाळी ०८.१८ वा.



## (६)
## पारदर्शी मन वसता

रंगरंगुल्या या पानांच्या
नितळ मनाला पहावे
जे जे दडले अंतरात ते
सहजी उमजून यावे

सुंदरता ती झळकत जाते
पारदर्शी मन वसता
आत बाहेरी नको वेगळे
अलवार भावना असता

रंग सारखे येतील उभरून
आपोआप रंगाने
देठ प्राण हे जोवर जोडून
जीवनरस संगाने

वृक्ष कर्म हे जाणून घ्यावे
कैक जन्माची बीजे
पूर्वसंचिते असतील उत्तम
सत्कर्म इथेही कीजे

उंच नभाने खुणावताना
वाऱ्यावर डोलावे
रोज एकदा त्या आतल्याला
परि सत्य बोलावे

आरपार असण्याचे जेंव्हा
कळेल गमक हे साधे
सुटतील गुंते धागे मोकळे
निष्प्रभ नशिबा प्यादे

दि.१८/०५/२०२४
सकाळी ०८.३५ वा.



## (७)
## संगत असता मोहिनी ऋतूची

मजसी खुणावे वाट हरितसी
सळसळ चैतन्याची
उडून जाती क्षणात दुःखे
सुखे मिळती जणू पुण्याची

पर्वतरांगा धुक्यात लपल्या
आकाशाचे धुरात घर
झडांवरती कोंब कोवळे
नवी जीवने फुलली वर

हिरवळ खाली हासून गाली
खळी पाचूची खुलवीत
सांजसकाळी निसर्गराणी
मोहविते मज भुलवीत

उतरून येती स्वर्गातून मग
आकांक्षा देवत्वाच्या
सतत वाटते शीश झुकावे
पुढती सुंदर दिव्यत्वाच्या

वाट कुठे जाते ही दूरवर
आत आत मजसी नेते
क्षणात माझे एकटेपण हे
संपून कैसे हो जाते

म्हणून रमते मीही हिच्याशी
सांगत मनीच्या गुजगोष्टी
संगत असता मोहिनी ऋतूची
नाही दिसत मी कधी कष्टी

दि.२९/०५/२०२४
सायं. ०६.१२ वा.




## (८)
## जीवन दुधावरली साय

हात मायेचा भोवती
तिनं असा गुंडाळला
जीव इवलुसा परी
जीवापाड सांभाळला

तिचं नाव गाव काय
समद्या हाय का माहीत
वसुंधराराणी माय
कोशी समदे ऱ्हाईत
तिच्या कोशात ऱ्हाईत

तिच्या हाताची पालवी
लई मऊशार गार
हिरव्या पांघरुणात ती
लेकरांशी जपं फार

पंचमहाभूतं तिच्या
लेकरांच्या दिमतीला
पर जाणीव ठेवावी
तिच्या अमोल किमतीला

सारं भकास करून
आता उजाड माय ती
जपा जपा सृष्टी ती तर
जीवन दुधावरली साय
जीवन दुधावरली साय

दि.०५/०६/२०२४
रात्री १०.०३ वा.
विश्व पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा



## (९)
## गुलमोहराची आली थंडाळी उन्हात

पिसारल्या गुलमोहराचा रंग काय
लाल लाल काया आणखी तो काय

झिपारल्या पानापानातुन कोण बोलं
स्वप्नाचा वारा जरा गार गार डोलं

फांदी फांदी डवरली सूर छेडते ना
घामाघूम शरीराचे श्रम तोडते ना

सावलीची सावळीशी खेळी चाललेली
शीतलशा ओट्यावर थंड बोललेली

खोड त्याचं सरळ की जरा वाकलेलं
उन्हं अंगावर घेत बंडी बेतलेलं

गुलमोहराची आली थंडाळी उन्हात
चला नजरेला सुख देऊ त्या भरात

दि.०८/०६/२०२४
रात्री १०.०५ वा.



## (१०)
## हे थेंबांचे मोती सुंदर

हे थेंबांचे मोती सुंदर
टपटप ओघळले
स्वर्गामधले नितळ हे मौक्तिक
जळ होऊन घळले

छळल्या होत्या उन्हे पानुल्या
झाडांच्या कवळ्या
सुकल्या होत्या रुसल्या होत्या
फुलण्याआधी कळ्या

जलधारांची सरगम छेडत
सूर मल्हार होई
हरकती मुरक्या घेत ही वर्षा
गाणे पावशी गाई

स्पर्श गारवे रंग ते हिरवे
थेंब किती बरवे
ओघळताना अन् घळताना
गळणे किती भरवे

फिरते फिरते चक्र नभातून
घन गंभीर आवाज
वर्षामधुनी चारमास ही
धरा सजवते साज

दि.२४/०६/२०२४
सकाळी ०७.०९ वा.



## (११)
## अनुरागासी नवे खुमार

तृषार्त धरणीवरती बरसल्या
पाऊसधारा जल्लोषे
कणकण गेला ओलावून हा
अंगोपांगी जल कोशे

थेंब पाणेरी टवटव टपटप
जीवन देती सुकलेल्यां
चैतन्याचे ओघ वाहती
सुख बरसाती मुकलेल्यां

सळसळ सळसळ वाहे धबधबा
झरे नदी होऊन जाती
कीट पतंग नि खग मानुषही
आनंदे जलसुर गाती

अशात हाती हात असावा
प्रियवर कोणी साथीला
दुःख भोगल्या ग्रीष्मालाही
कोंब फुटू दे सुख पातीला

स्वर्ग धरेचे मीलन होता
अंकुर येतील नवजन्मा
पुन्हा नव्याने पल्लव फुटतील
डोलू लागतील नव्या खुणा

चक्र ऋतूंचे फिरते ऐसे
क्षणात शमतील दुःख धुमार
खळी खुलावी कळी उमलावी
अनुरागासी नवे खुमार

दि.२८/०६/२०२४
सकाळी ०९.५२ वा.



## (१२)
## बरस बरस हे बरस नभा

बरस बरस हे बरस नभा
आषाढाचा मास उभा
आस आगळी धरतीला
भिजव प्रेमाने भुईगाभा

सळसळत्या झाडांवर बैस
पानोपानी दवास पैस
कळ्या फुलांच्या खळ्या होऊनी
हास पावसा तू ऐसपैस

तुझ्या प्रेमाचा गंध हुंगु दे
अन मातीचा सुगंध घे
गगन धरेच्या मीलनास या
मल्हाराचे तू छंद दे

सूर ओलिते ओल्या ओळी
ओले नाद हे ओल्या गायळी
शहारलेल्या सृष्टीमध्ये
उमलून येईल हृदय पाकळी

झरझर झरझर पाऊस झरता
कुठे सखी मज मनात स्फुरता
पाऊस संपे प्रीत तजेली
खुणा माधुरी जीवनी उरता

दि.०८/०७/२०२४
सायं. ०६.४८ वा.



## (१३)
## जीव पावसातून गोळा

थेंबाच्या पडद्यामधले
गूज पावसाचे ऐकू
चिंब चिंब भिजताना जरा
निवांत सरी मध्ये टेकू

धूसर धूसर दिसेल सारे
तरीही पाणी स्पष्ट किती
स्पर्श हवासा मना दिलासा
जीवनाची संपेल भीती

एकच गाणे सुरेल त्याचे
टपटप सरसर सरीतुनी
अंगावरती थेंब पडावे
खळखळ झरणे दरीतुनी

कोठून येती पाऊस धारा
रिमझिम स्वर्गातून जशा
मरगळ फिटते आशा वाटते
चैतन्याची नवभाषा

केवळ पाऊस केवळ आपण
निव्वळ स्मृतीमय हिंदोळा
भिजल्या धारणीवरती भिजला
जीव पावसातून गोळा

दि.०९/०७/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



(१४)
**पाऊस म्हणजे काय**

भिजून हासल्या कळ्या फुलांना
पाऊस म्हणजे काय
हळूच पुसावे जरा विसावे
समजून घ्यावे उपाय

दलादळातून उत्साहाचे
फुटतील नवे खुमार
दवबिंदूंच्या अवखळ खोड्या
नवेच त्यांचे धुमार

धारा थोड्या तारसुरांनी
तालातून वाहतील
तशाच लज्जा गालावरची
भ्रमर कुसुम पाहतील

नव संदेशा नव्या त्या दिशा
अलगद स्वीकारून
डोलून जाईल फांदी हळवी
भावतुरे लेऊन

कधीतरी मग विश्रांती तो
पाऊस घेताना
स्मृती ओलसर आणिक गंधित
मातीस देताना

आठवून आषाढ नि श्रावण
संवत्सर जावा
पाऊस माझ्या काळजात हा
खोलवरी रहावा

दि.१२/०७/२०२४
सकाळी ०९.०१ वा.



## (१५)
## आई म्हणजे तत्त्व चिरंतन

ही मायेची छत्रछाया जी
माय शिरावर धरते
जगात सांगा कोण आईसम
स्नेह लेकरा करते

येतील कितीही विपदा भयंकर
देह शस्त्र होतो ना
तिच्या मनातील आशीर्वचनही
अस्त्र बाण होतो ना

तिच्या चिंतनी वात्सल्याची
ओढ सदा जाणवे
आणिक स्पर्शातून तिचा तो
स्वर्ग जणु मानवे

श्वासासंगे लेकरु चिंता
काळजात चालते
जन्मभरी ती निज संततीस्तव
हळूच आसू ढाळते

सुख मागावे केवळ आईने
पिलांसाठी निरंतर
पशु पक्षीण की मानव माय ती
भाव तिचे अजरामर

आई म्हणजे तत्त्व चिरंतन
ईश रूप गोडवा
आई म्हणजे जन्मांतरीचा
बंध निखळ जोडवा

दि.१५/०७/२०२४
रात्री ०९.३६ वा.



## (१६)
## पाऊस गुडूप व्हावा

धो धो धो धो कोसळताना
भेट कुनाची घेतो
किती युगांचा विरह साहुनी
मीलनास तू येतो

आवर आवेगास पावसा
तुडुंब भरल्या सरिता
बरसून जाशील धुंदीमध्ये
तुझ्या प्रियेच्या करिता

भरून येईल आभाळाचा
ऊर तुझा दाटला
बरसण्यातल्या आनंदाने
चरम भाव गाठला

साक्षी होऊन सृष्टी सारी
शहारली अंगाने
नवे उमलणे नवेच फुलणे
नव्या नवेल्या रंगाने

घेत विसावा देई दिलासा
किंचित विराम घ्यावा
पुन्हा प्रियेच्या बाहुंमध्ये
पाऊस गुडूप व्हावा

दि.१९/०७/२०२४
सकाळी ०८.३२ वा.




## (१७)
## मधुर मधुरतम माधुर्याची

ओथंबून मग येणे म्हणजे
प्रपात पहावे होऊन
वर्षा होता प्रीतीभरली
मस्त घ्यावे की न्हाऊन

सोडून द्यावे झोकून थोडे
स्वतःस उंचावरुनी
खळखळ अवखळ भावप्रवाह ते
मुक्त मोकळे करुनी

रूप वेगळे स्वरूप होते
निजरूपाची गोडी
अनुरागाची सृष्टी फुलता
लाली उमटते थोडी

मधुर मधुरतम माधुर्याची
ओढ जिवा मग लागे
मन हे वेडे अजून थोडे
वेड्यासम का वागे

क्षणात विरतील ताप युगाचे
पुण्य फळाला येईल
सुखद क्षणांची रेलचेल मग
सुखासुखी बघ होईल
सखया, सुखासुखी बघ होईल

दि.२२/०७/२०२४
रात्री ११.२२ वा.



## (१८)
## थांब जरा तू राजा वरुणा

सरीत सर मिसळुनी ती झरते
झरझर पाऊसधारा
पिसाट होतो बेकाबू का
बेभान तुफानी वारा

मनात पाऊस भीती ओलसर
गुडूप घरातून होणे
कुठे पुराच्या धोक्यापायी
पाय माघारी घेणे

कडकड कडकड विजा चमकती
काळोखात दामिनी
रुद्र भयानक वाटून जाते
मुसळधार यामिनी

काय ठरविले आभाळाने
जलमय सृष्टी व्हावी
पाणी पाणी जिकडेतिकडे
आणीबाणी कळावी

थांब जरा तू राजा वरुणा
बरसत किती रे राहशील
जीव टांगणी नदी अंगणी
अंत कितीसा पाहशील

दि २५/०७/२०२४
सकाळी ०९.१६ वा.



## (१९)
## हरित दुलई जी अंथरलेली

हरित दुलई जी अंथरलेली
भुई नटून नटवरली
हलक्या हवेच्या झुळूकेसंगे
फुले सान डवरली

उभ्या उंच तरुतळी मखमली
हिरवाई पसरता
त्यावर छाया गडद सांडते
भान सृष्टी विसरता

आकाशाच्या फिकट निळ्याशा
छत्रीने उघडता
रंगसंगती सुरम्य सुंदर
अवकाशातून घडता

पायवाट काढुनी वाटुली
धुंद चालून जाते
मनात आपुले सूर छेडूनी
गाणे पोपटी गाते

तशात उडती फूलपाखरे
मधु भक्षण करण्याला
गंध सुगंध नि परागकण ते
जीवनात भरण्याला

सजली धजली सृष्टी सुंदर
रूप नवे साजिरे
कसे विसरावे नभ सखयाने
तिचे हास्य गोजिरे

दि.२६/०७/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (२०)
## भीज पावसाची

भीज पावसाची शीतल शहाऱ्याची
धुंद राहण्याची ही संगती अशी
गाभुळला ऋतू जाई उतू उतू
भावनांची हुतुतू संमती कशी

धुरव्यात धुकं काळजाचं ठोकं
बधिरलं अंग अंग दंग होत बसं
नजरेत लाज तिचा दाटलाय साज
कोपऱ्यात डोळ्याच्या अलवार हसं

छत्रीत एका, बिलगून एकमेका
तुझ्या माझ्या भावनांचा,
उंच उंच झोका
जरा जरा थांब, जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा, मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे, काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा, थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया, उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत, आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (२१)
## जावळाचे शेत

जावळाचे शेत उगवून किती डोले
पावसाच्या संगतीने हिरवाई बोले

आकाशाला टेकायचे मनी रोपट्याच्या
जमिनीशी नाळ मुळे बांधलीत त्याच्या

मधे वारा खेळवितो पाळण्यात बाळं
कवळ्याशा अंकुरांचे तान्हुले की चाळं

हसतात बोलतात खेळतात रोपं
पावसात जगायाचं आहे किती सोपं

नको दडी मारू बाबा हिरमुसतील
सुकूनिया पात्या रडू मुसमुसतील

दि.३०/०७/२०२४
सकाळी ०७.३८ वा.



### (२२)
### पाऊस हा दुराव्याची
### दोर कशी तोडी

भिजलेल्या पंखातली झेप ओली ओली
उंच आकाशात जाता काळजाची खोली

मेघ वाहतात किती जळांच्या पखाली
बरसून हलकेसे वारे कोण घाली

घरट्यात कोण आहे चिवचिवणारे
चारा ओला माया ओली डोळे दिपणारे

काडी काडी घर माडी मन मन जोडी
पाऊस हा दुराव्याची दोर कशी तोडी

उघडून खिडकीशी विसाव्या पहावे
आत ऊबदार पावसाळ्यात रहावे

दि.३१/०७/ २०२४
सकाळी ०९.२० वा.



(२३)

## वाट कुणाची पाहते धरणी

पावसातली हिरवळ कवळी
छटा निराळ्या सुंदर
कसे मी रमते त्या रंगातून
मोद मिळे अपरंपर

कुणी निर्मिले रंग अनोखे
बहर बहरुनी येते
वसुंधरा का प्रिया मीलनी
अशी मोहरून येते

अंगावरती हिरवी वसने
हिरवा शालू नेसून
वाट कुणाची पाहते धरणी
सजून धजुनशी बैसून

अंगाखांद्यावरी तियेच्या
प्रेमांकुर रुजताना
प्रियतम वर्षावात सखी
बेधुंद अशी भिजताना

अधरांवरती गीत तियेच्या
आपसूक उमटून येते
भेट अनोखी वर्षा ऋतूची
नयना मिटून घेते
ती नयना मिटून घेते

दि.१२/०८/२०२४
रात्री ११.५७ वा.



## (२४)
## **जरा वळून पहावे**

खळखळ अवखळ पाणी ओघळे
नाव धबधबा त्याचे
जोश होश उल्हास कोसळे
पहा तुषार तयाचे

त्या पाण्याला वेग कुठूनसा
कुठून आवेगही तो
किती उंचावर असतानाही
पडतो प्रवेगही तो

एक ताल एक सूर उमटतो
जलधारांच्या नादे
रम्य निवांतशा रानीवनी मग
गीत तयाचे गाजे

कुणी कधीतरी येते पाहण्या
रूप तयाचे अनावर
कसा घालावा मनास बांध हो
कसा ठेवावा आवर

कधीतरी होऊन धबधबा
मुक्त कोसळून जावे
पडता पडता उगमस्थाना
जरा वळून पहावे

दि.१३/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.



## (२५)
## पुनव मनात विराळी

जळात पडल्या चांदोबाच्या
चांदण्याचे कौतुक
जळ ही होते चांदीसारखे
संगत शीतल आपसुक

चंचल चंचल लहरींवरती
लाट सुखाची येते
चांदण्यातल्या अलगदतेवर
हलके घेऊन जाते

ती झाडाची पहा डहाळी
कशास वाकून गेली
चांदण्यातली रात तिचीही
चांदणे माखून गेली

चंद्र कितीही करो कोंडाळे
चांदणे झिरपून जाते
खूण एक रात्रीस नभातून
हलके उतरुनी येते

तोच चंद्र अन्? तीच रागिणी
रोज कांती निराळी
मनास उधळून लावत जाते
पुनव मनात विराळी

दि.१८/०८/२०२४
सायं. ०६.१६ वा.



## (२६)
## चिंब ओल्या वाटेवरती

चिंब ओल्या वाटेवरती
मोती सांडलेले
बघ दवाचे थेंब चमचम
पल्लवीशी मांडलेले

स्पर्श ओले ओलीत्याचे
मेण वाटे मृत्तिका
गप्प होती जी उधाणली
काळजातून वृत्ती का

झाडे वेली डोलताना
थंड झुळुका वाहती
त्या गवतपात्या लाजुनी
प्रीतरंगी नाहती

डोकावून पाहे सविता
पावसाच्या अंगणी
इंद्रधनूच्या वाकलेल्या
त्या कमानी रंगणी

आज येतो गंध कोठून
मंद धुंद सारखा
त्या फुलांना त्या भुईला
होवो ना कधी पारखा

दि.२२/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.




(२७)

**बरवा श्रावण जन्मला**

मोद भरला आसमंती
तो बरसला उन्मला
मास मधु येऊन जाता
बरवा श्रावण जन्मला

फिरती मधुकर पुंजिका
वनराणीच्या अंचला
पुष्पिकांना उमलविण्या
बरवा श्रावण जन्मला

पालवीच्या तोरणाला
कोंब वेडा दंगला
रंग हिरवे ओतण्याला
बरवा श्रावण जन्मला

ऊन पाऊस पाठशिवणी
इंद्रधनुचा कुंचला
चित्र देखणे रेखण्याला
बरवा श्रावण जन्मला

नभ धरेच्या भेटण्याची
आस वाढते चंचला
मीलनाच्या सोहळ्यातून
बरवा श्रावण जन्मला

दि.२३/०८/२०२४
सकाळी ०९.३१ वा.



## (२८)
## भरलेल्या मेघांची तोरणे

असा पाऊस मोहरून यावा
आयुष्याचा उत्सव व्हावा
थेंब कळ्या सुखाच्या बरसता
दाह पोळता विझून जावा

त्याची वाट किती मी पहावी
जीव कलिका सुकू न द्यावी
आस चातकी उरात राखत
सर अंगावरी ती झेलावी

स्पर्श शीतल गारवे धुंद
स्वप्नं उमलू पाहते मंद
मज हरीचा जडतो छंद
तीरी यमुनेच्या कृष्णगंध

आता जावे कुठे नि कशाला
वर्षा प्रीतीची हृदयी बंद
सारे करता समर्पणाला
अंतःकरणी आनंद कंद

अस्सा पाऊस दवाचा दूत
थेंब मोतीयाचे ओंजळीत
जरा थांबला दडून वेडा
हास हासत कवळ्या कळीत

फुले पावसाची वेचताना
मन ओलावून परिमळे
आठवांच्या नदीला भरते
वर शांत मनी खळखळे

एक पाऊस आत राहतो
कधी कोसळतो कधी नाही
भरलेल्या मेघांची तोरणे
थेंबपाऊस दाराशी काही

दि.२९/०८/२०२४
सकाळी ०७.४९ वा.



## (२९)
## ती शुभांगी पुष्पिका

पाहिले का गोड गुलाबी
हासणे फुलराण्यांचे
लीला परमेशाची लीली
सूर कोमल गाण्यांचे

अंग अंग कोमलांगी
ती शुभांगी पुष्पिका
कोष भरले मार्दवाचे
राहते पहा खुश ती का

एक सानू झुळुक येता
डोलते ती बोलते
आत दडल्या मूक भावा
जाणते कुणी खोल ते

उमलुनी जगणे कितीसे
सुकणे आहे ठरलेले
तरीही फुलवीत निज मनाला
सुमन अंगणी उरलेले

रंग स्पर्श नि गंध सारे
ओळखीचे वाटते
सौख्य वेडे त्या फुलांच्या
सुरभीतुन मज भेटते

दि.०१/०९/२०२४
सकाळी ०९.३८ वा.



## (३०)
## वर्षाराणीचे चित्र मोहक

पाऊस भरल्या आभाळाला
सपान रंगीत पडलं
भुईवर लाजून फुलाफुलांचं
गोड गुपित हे घडलं

उमलून आल्या कळ्या कोवळ्या
रंग अंगात भरले
लाल, गुलाबी, शुभ्र नि पिवळे
पोपटी गाणे उरले

एक एकटा वृक्ष पठारी
साक्षी होत डवरला
पानोपानी त्याच्याही मग
उत्साह किती हो भरला

अंथरलेली दुशाल मऊ ती
कुसुम पायघडी होते
स्पर्श मुलायम नेत्रसुखाची
अजोड मनघडी होते

आभाळाचे बरस बरसणे
कलिका लतांचे झुलणे
सुरभीनेही मंदमंदसे
आसमंतास भुलणे

नयनांमध्ये जरा भरावे
थेंब दवाचे लोभस
चित्र असे का कुणी काढले
वर्षाराणीचे मोहक

दि.०४/०९/२०२४
सकाळी ०९.५४ वा.



## (३१)
## इथे विसावती कला

मेघ पांघरले कुणी
नग कळस दिसेना
नभ गुडूप झाले हो
कुणा कुठे गवसेना

कुणी हिरवी पोपटी
सांगा दुलई घेतली
आत दडून कुणी हो
पाचू माळ ती वेचली

तरुवर एकटाच
उभा शांत नि निवांत
त्याची सावली खेळते
ऊन सावल्यांचे भ्रांत

इथे गुंजते कुणाचे
फक्त एकाऽऽकीपण
नसे आवाज रवाचा
मूर्त एऽऽक टाकीपण

इथे विसावती कला
इथे चित्र रंगतात
रसिकांसवे नित
कलाकार दंगतात

दि.०१/१२/२०२४
सकाळी ०८.५७ वा.



## (३२)
## सांगते सृष्टी ही काय

हा किनारा हलका वारा
दे दिलासा या मना
सावळ्याशा श्यामरंगी
सागराची साधना

त्या नभातून रंग पडतो
या जळातुन मावतो
जीव वेडा पंख लेऊन
झेप घेण्या धावतो

वाटते आयुष्य ऐसे
गूढ ते तळ ना कळे
काय आणि केंव्हा येथे
कैसे कोठून आकळे

एक उर्मी जागते ती
क्षणी पुन्हा विलयास जाय
चालते ते चक्र नेमीच
सांगते सृष्टी ही काय

पाठमोरी तू पहावी
ही छबी माझी अशी
सामोरी मी जात राहीन
जीवनाला नित जशी

दि.०५/१२/२०२४
रात्री ११.५४ वा.



**(३३)**

## बीज अंकुरे अंकुरे

बीज अंकुरे अंकुरे
आस उभरून येता
आत भुईच्या कुशीत
रोप तरारून जाता

काय सांगते ती माती
जप बाळा नातीगोती
पानं फुलं कळ्या शाखा
भार कधीही ना होती

होत जाईल विस्तार
मुळं माझ्याशी जोडली
जर असतील सदा
कुणी कितीही तोडली

पुन्हा होईन मी माता
संजीवन स्तन्य देता
पुन्हा पुन्हा नववी
संतती की जन्म घेता

आत खोल रुजलेले
धागे स्नेह भरलेले
बंध घट्ट अंतरीचे
शब्दातीत ठरलेले

दि.१२/१२/२०२४
सकाळी ०९.३८ वा.



## (३४)
## नयनसूख कोणते कळावे

पिवळ्या धम्मक रंगामधली
उधळण पाहून घ्यावी
नयनसूख कोणते कळावे
मरगळ झटकून जावी

ही पाने की फुले उमलली
तरुवर कांचनपेठा
कुण्या अप्सरेचा हा वाटे
भूवर आला हेका

तिच्या आभूषणसेवेसाठी
सुवर्णतरु साकारे
येथून वेडावून सोनेरो
होत वाहती वारे

क्षणात वाटे कुणी उधळला
भंडारा उत्साहे
मनात काही आशा आणिक
स्वप्नं सुंदरी राहे

जरा विसावून मनात आता
सोन्याच्या आठवणी
पुन्हा पुन्हा मग करीत जावी
येथ मना पाठवणी

दि.३१/०१/२०२५
रात्री ११.३२ वा.



## (३५)
## दिशा उजळता ज्योती पसरते

लाल लाल मनमोह रक्तिमा
सुंदर शोभा सूर्याची
रोज प्रभाती उधळण होते
अनंत असल्या तेजाची

कळ्या उमलती फुले डोलती
चैतन्याची पखरण
दिशा उजळता ज्योती पसरते
नित्य नवी प्रभा पसरण

रोज निशेला जाग्या होती
अंधाराच्या त्या राण्या
रविकिरणांच्या उगवणी संगे
निद्रा आळवती गाण्या

कोण सकाळी दे संदेशा
उठा उठा हो जागे व्हा
दिनचर्येच्या आरंभाला
ईशस्मरणी दंग रहा

कर्म करावे असे अखंडित
रविराजा जसे नियमित
कोण थांबवू शकेल कीर्ती
लाभेल ख्याती जी अमित

दि.०३/०२/२०२५
सकाळी ०८.४२ वा.



## (३६)
## वसुंधरा यौवनात

वसुंधरा यौवनात
येते वसंतात ती भरात
कुहू कुहू कुजन करून कोकीळ
गाईल मधुर स्वरात
नवीच स्वप्ने जागी मनात
येते वसुंधरा यौवनात...

नव्या पालवीसंगे फुटतील
कोंब नव्याने धरतीला
रंग आगळे ढंग वेगळे
चढतील गंधित मातीला
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

परिमळ सुंदर पसरून जातील
फुले दिव्यशी उमलून जातील
नवी चेतना नवी प्रेरणा
नव आकांक्षा हृदयी राहतील
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

हिरवा हिरवा कंच शालू ती
अंगावरती लेऊन शोभे
ऋतुराजाच्या आगमनाने
लहर चैतन्याची गाजे
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

मऊमऊ हिरवा दिसे गालिचा
हरिततृणांच्या मखमालीचा
पाचू सांगा कुणी अंथरले
सूगंध हुंगुन घ्या मातीचा
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

दि.०४/०२/२०२५
सकाळी ०४.५८ वा.



## (३७)
## घर वेगळे नकोच सजणा

निसर्ग देतो साद मागतो
प्रतिसादाला आपुल्या
जीवन करतो सुरम्य सुंदर
गोष्टी देऊनी भल्या भल्या

रंग पिसारे खुलवून सारे
रंग रंगीले करतो स्वप्ना
कधी वाटते आई तो तर
कधी बाप कणखरसा कणा

जलतरंग उठतात हलकेसे
हलक्या हलक्या सरी बरसती
चातक वेडे प्रेमापोटी
मेघधारांसाठी तरसती

गवतावरच्या फुलराण्यांशी
हितगुज साधून घ्यावे थोडे
फूलपाखरांच्या संगे मग
गुंजन व्हावे गोडे गोडे

घर वेगळे नकोच सजणा
इथेच राहू कुशीत सृष्टीच्या
फिटतील साऱ्या पारणवेळा
नव्या उघडतील झडपा दृष्टीच्या

दि.०८/०२/२०२५
रात्री ११.३४ वा.




## (३८)
## प्रभातवेळी किरणशलाका

प्रभातवेळी किरणशलाका
येतील बघ भूवरी
स्वर्ग सापडे तेजामधुनी
हर्षित हो शर्वरी

झाडावेलींच्या गाळणीतून
गाळून येतो रवी
नव्याच ढंगामध्ये उजळते
अंधारी ही अटवी

हास्य उमटले जणू इंद्राचे
की चांदणे चंद्राचे
जरा उजेडी वातावरणी
गगनी रंग मंद्राचे

निळसर सुंदर छटा पसरती
मन निळसर जणु श्याम
रोज सकाळी येशील सखया
होऊन तू अभिराम

एक प्रेरणा एक चेतना
कुणी पाठवली पहा
सौंदर्याची परिभाषा ही
लोभसवाणी अहा

दि.१५/०२/२०२५
सकाळी ०७.४२ वा.



(३९)

## दाण्यादाण्यात शिरीहरी

रान झाडांच्या सावलीत
जरा जरासं इसावलं
शेताशेताच्या बांधाला
माड माडाचं गाव गावलं

दूर पल्याड नदीच्या
काठाकाठानं जीव रमला
मनामनात चढतोया
हिरव्या सपनांचा इमला

पायाखालची माती ही
कणाकणात रुजतीया
येता मायेची सर सर
वली चिंब ती भिजतीया

रोज पूजा मी बांधतीया
शेत कसून रांधतीया
घरादारात सुख सांडऽऽ
कानाकानात सांगतीया

हिव जराशी झोंबतीया
शिरशिरी अंगावरी
रान जीव व्हता माझा
दाण्यादाण्यात शिरीहरी

दि.१७/०२/२०२५
सकाळी ०७.५७ वा.



(४०)
## वसंतातली वसंतगाणी

वसंत येता उसंत लाभे
मनास वेड्या काही
मदन मनातून जागा होतो
स्वप्न दाखवत राही

झाडे वेली नव्या पालवी
नव्या रूपाने नटती
हिरवाईने सृष्टीमधल्या
पारणे डोळा फिटती

कुहुकुहू गाते सूर कोकीळ नि
आम्रतरुशी मोहोर
गंधित वारे जळी तुषारे
उमलून भावफुलोर

कर हा करी घेऊन प्रियवरा
उद्यानात विहार
सुगंध घेऊन येतो पवनही
मनात सुरभी सार

वसंतातली वसंतगाणी
वसंत उमले आत
वसंत वाटे सखा जवळचा
वसंत हा हृदयात

दि.३१/०३/२०२५
सकाळी १०.०८ वा.



## (४१)
## काही कवडसे ऐसे

रोज येऊ दे घरी कवडसा
हलकासा तेजस्वी
परलोकातून दिव्यत्वाची
प्रचिती जणु ओजस्वी

तेच रोजचे घर जे आपुले
उजळून चकाकते ना
एक प्रेरणा जगण्यासाठी
देऊन लकाकते ना

देह घराच्या खिडक्या बुद्धीच्या
जरा उघड्या ठेवाव्या
अंतःप्रकाश देई कवडसे
ज्योती किती तेवाव्या

त्याच प्रकाशातून सापडे
कांती नवी उजळती
नवीच आशा नव परिभाषा
नवोन्मेषही फळती

हृदयामध्ये जतन जपावे
काही कवडसे ऐसे
जणू मिटताना उमलून यावे
पंचप्राणांनी तैसे

दि.०१/०४/२०२५
सकाळी ०७.३२ वा.



हिरवाईच्या आतून दडली
किती पोषणे त्यात
ब्रह्माण्डाची उत्पत्तीही
सामावली हो जलात

## (४२)
## ही पाण्याची कहाणी

थेंबाथेंबातून जन्मतो
जीव नवा जणू जेथे
इतुकी शक्ती निसर्ग देतो
जपणे त्याला येथे

थेंबे थेंबे तळे साचते
सुख जगण्याचे लाभे
जल हे जीवन चैतन्याचे
गोड रूप ते राजे

जीव जन्मतो जळात कणभर
मरता घशात पाणी
जगण्या मरण्यासाठी कारण
ही पाण्याची कहाणी

चला वाचवू जीवन आपुले
शुद्ध ठेवणे त्याला
अमृत कोणी इथे प्राशिले
घ्या जल भरला प्याला

दि.०२/०४/२०२५
सकाळी ०९.०६ वा.




## (४३)
## सुरम्य जगणे दिसावे

असे वाटते इथे रमावे
निवांत निळ्या नभतळी
सरोवरातील प्रतिबिंबाचे
चित्र मोहवी जळी

पाचू पसरले मन हे विसरले
इथेच मी त्यावेळी
शोधून घेईन स्मृतींस नेईन
भुलून याही वेळी

आकाशातील शुभ्र पांढऱ्या
ढगात स्वप्न हे वाहे
तरंगून मी हलके हलके
त्या नगरीतच राहे

फुले उमलुनी गाती गाणी
सुरेल स्वर सांगाती
पर्वतरांगा निळसर हिरवट
अनवट वाटा जाती

पुन्हा पुन्हा मी इथेच यावे
जरा बसावे हसावे
पुन्हा पुन्हा मज मनास येथे
सुरम्य जगणे दिसावे
सुरम्य जगणे दिसावे

दि.०४/०८/२०२५
सकाळी ०८.१८ वा.


DR. MANJUSHA KULKARNI
LITERATURE - SANSKRIT



# PRINT MEDIA COVERAGE



दिव्य मराठी

जळगाव सिटी 20-05-2025

# संस्कृत भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न व्हावेत, तिचा प्रचार-प्रसार आवश्यक

## गोदावरी महाविद्यालयातील संस्कृत भारतीच्या संवाद परिषदेत उमटला सूर

प्रतिनिधी | जळगाव



गोदावरी महाविद्यालयातील संवाद परिषदेत माहिती देताना डॉ. मंजूषा पाटील.

संस्कृत भाषा ही परीस्पर्शासारखी आहे. तिच्यामुळे जीवनाचे सार्थक होते. ही विद्या व कला आहे म्हणून संस्कृत आत्मसात करा आणि नंतर ती तुम्हाला प्रगट करेल. जोवर संस्कृत भाषा जीवनात आहे तोपर्यंतच चैतन्य आहे. त्यामुळे संस्कृत भाषेच्या बाबतीत सकारात्मक रहा. संस्कृत भाषा ही आपली आई आहे. तिचे जतन करणे आणि तिचा प्रचार-प्रसार करण्याची आज आवश्यकता असल्याचा सूर संस्कृत भारतीच्या संवाद परिषदेत उमटला.

